आर.सी.सी. क्र.२८१/२०२२

नि.क्र. १४५ लगत जोड

**<u>सरकार पक्षातर्फे साक्षीदार क्र. १३ यांचा पुरावा</u>**

मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,

माझे नांव – भुषण माधव संखे

वय –३६ वर्षे, व्यवसाय –शाखा अधिकारी

राहणार–शिरपूर, जि.धुळे

**<u>सरतपासणी सहा. सरकारी अभियोक्ता श्री.आर.एस.पटेकर यांचेमार्फत</u>–**

सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे येथे मी शाखाधिकारी म्हणुन १९.१२.२०१९ ते ऑक्टोबर २०२० पावेतो कार्यरत होतो. त्यानंतर माझी बदली शिरपूर शाखेत, ता.शिरपूर, जि.धुळे येथे झाली. गौतम जाधव यास मी तो सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे येथे ८/१० वर्षापासुन बँक मित्र म्हणुन काम करत असल्याने ओळखत होतो. बँक मित्र म्हणुन त्यांचे काम म्हणजे जे लोक बँकेत येवु शकत नाही त्यांचे वतीने फॉर्म भरणे, पैसे जमा करणे, पैसे काढणे, बँक वसूलीमध्ये मदत करणे अशी कामे होती. गौतम जाधव यास एक लॅपटॉप दिलेले होते व त्यास बी सी कोड दिला होता. त्यावरुन तो काम करायचा. आरोपी वडझीरे गावाचाच असल्यामुळे त्याच्यावर लोकांचा विश्वास असल्याने त्याने लोकांचा विश्वास संपादीत करुन त्यांचा विश्वासघात केला. आरोपी लोकांकडुन पैसे विथड्रॉ करुन घ्यायचा व स्वतःच्या अकाउंटमध्ये जमा करायचा. काही लोकांनी त्यास एफडीसाठी दिलेल्या पैश्यांबाबत तो खोटे एफडी त्यांना द्यायचा. आरोपी एफडीच्या पावत्यांवर अधिका–यांच्या खोटया सहया करुन द्यायचा जेणेकरुन त्या ख–या वाटतील. त्या पावत्या शिर्के व तिकोणे यांच्या होत्या. शिर्के यांची रु.३,८०,०००/– ची एफडी पावती व तिकोणे यांची रु.१,५०,०००/– ची एफडीची पावती होती. ग्राहकांच्या तक्रारी आल्यावर आम्हाला कळाले की आरोपीने खोटया सहया करुन खोटया एफडीच्या पावत्या दिल्या आहेत. त्यासंदर्भात २०२२ साली रिजनल ऑफीसरने फिर्याद दिली होती. त्याबाबत माझा पारनेर पोलीसांनी दि.८.८.२०२२ रोजी जबाब माझ्या सांगितल्याप्रमाणे घेतला. घटनेसंदर्भात पोलीसांनी मला पंचनाम्यासाठी व सहयांचे नमुने घेण्याबाबत बोलावले होते. शाखाधिकारी ढवण, कॅशीयर बोरुडे व

पोलीस वाघ व मी पंचनाम्यासाठी सेंट्रल बँक ऑफ इंडीया शाखा वडझीरे येथे हजर होतो. पोलीस स्टेशनला आमच्या सहयांचे नमुने घेतले होते. आता मला माझ्या घेतलेल्या सहयांचे नमुने ज्यावर एस १६९ ते एस १७४ मार्कींग आहे ते दाखवण्यात आले. त्या सहयांच्या नमुन्यातील सहया माझ्याच असुन त्यावर पंच म्हणुन पंचांची व तपासी अधिकारी यांची सही आहे. प्रत्येक पानावर माझ्या सहयांचे ६ नमुने आहेत. पोलीसांनी ते आमच्यासमक्ष जप्त केले होते. एस १६९ मार्कींग असलेले सहयांचे नमुने यास ओळखीसाठी **नि.१४६**, एस १७० मार्कींग असलेले सहयांचे नमुने यास ओळखीसाठी **नि.१४७**, एस १७१ मार्कींग असलेले सहयांचे नमुने यास ओळखीसाठी **नि.१४८**, एस १७२ मार्कींग असलेले सहयांचे नमुने यास ओळखीसाठी **नि.१४९**,एस १७३ मार्कींग असलेले सहयांचे नमुने यास ओळखीसाठी **नि.१५०** व एस १७४ मार्कींग असलेले सहयांचे नमुने यास ओळखीसाठी **नि.१५१** देण्यात येते. आरोपी आज न्यायालयात हजर आहे.

**उलटतपास आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी. रोकडे यांच्यामार्फतः**

वडझीरे शाखेतील फ्रॉड कधीपासुन ते कोणत्या तारखेपर्यंत झाला होता हे मला सांगता येणार नाही. मी शाखाधिकारी असताना माझ्याकडे या केसमधील तक्रारदारांपैकी तक्रारदाराचा अर्ज आला होता. कोणाचा अर्ज आला होता त्या तक्रारदाराचे नाव आता लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की वडझीरे शाखेतुन माझी बदली झाल्यानंतर काही तक्रारदारांचे अर्ज हेड ऑफीसला आले होते.

प्रश्न– तुमच्याकडे आलेल्या तक्रारी अर्जामध्ये केवळ गौतम जाधवचेच नाव होते का इतर व्यक्तीचे नाव होते?

उत्तर– केवळ गौतम जाधवचे नाव होते.

मी वडझीरे शाखेत असताना वडझीरे व निघोज येथील लोकांनी सेंट्रल बँक ऑफ इंडीयामधील कर्मचा–यांविरुध्द आंदोलन केले असे काही झाले नाही. दि.२६.३.२०२१ ते दि.३.४.२०२१ मधील झालेल्या स्पेशल ऑडीटबाबत मला काही माहीत नाही. हे म्हणणे खरे आहे की माझा पोलीसांनी जबाब माझी बदली झाल्यानंतर घेतला होता. पोलीस स्टेशनला आल्यावर जबाबावेळी स्पेशल ऑडीटबाबत मला माहीती झाल्याचे मला आठवत नाही. मी मॅनेजर असताना मी

धरुन वडझीरे शाखेत ३ जण होते. त्यामध्ये मी, कॅशीयर बोरुडे व अॅग्रीकल्चरल ऑफीसर होते. मी मॅनेजर म्हणुन वडझीरे शाखेचा कार्यभार आधीचे मॅनेजर कांबळे यांच्याकडुन घेतला.

प्रश्न– कांबळे यांच्याकडुन मॅनेजर म्हणुन चार्ज घेताना सगळे रेकॉर्ड तुम्ही नीट असल्याबाबत तपासले होते का?

उत्तर– नाही. एवढे चेक होत नाही. मी ऑफीसचा मॅनेजर म्हणुन कांबळे यांच्याकडुन डायरेक्ट चार्ज घेतला.

मी चार्ज घेतल्यानंतर TDR रिसीटच्या रजिस्टरमध्ये व TDR इश्युअन्स रजिस्टरमध्ये नोंदी नसल्याबाबत स्पेशल ऑडीटमध्ये नमुद असल्याचे मला कळाले नाही. TDR रिसीटचे रेकॉर्ड रजिस्टरमध्ये व कॉम्प्युटरमध्ये असते. TDR रजिस्टर लॉकरमध्ये नसते. ते कॅशीयर किंवा इतर अधिका–याकडे असते. हे म्हणणे खरे आहे की TDR रिसीटचे रेकॉर्ड TDR इश्युअन्स रजिस्टरमध्ये ठेवणे अत्यंत गरजेचे असते. हे म्हणणे खरे नाही की ती ठेवण्याची जबाबदारी बॅंक मॅनेजरची असते. मी सांगतो की ती जबाबदारी कॅशीयर किंवा इतर ऑफीसरची असते. हे म्हणणे खरे आहे की TDR रेकॉर्ड तपासण्याची जबाबदारी बॅंक मॅनेजर, असीस्टंट बॅंक मॅनेजर व कॅशीयर यांची असते.

उलटतपास मध्यान्हापर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही.
(एन.एस.सबनीस)
दिनांकः ३०/०८/२०२५. न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,
पारनेर.

**<u>उलटतपास मध्यान्हानंतर आरोपीकरीता विधीज्ञ श्री.ए.पी. रोकडे यांच्यामार्फतः</u>**

हे म्हणणे खरे आहे की TDR रिसीट रजिस्टरमध्ये TDR इश्युअन्स रजिस्टरची नोंद नसेल तर हेड ऑफीसला कळवावे लागते. हे माझ्या लक्षात नाही की TDR इश्युअन्स रिसीटची रजिस्टरमध्ये नोंद नसल्याबाबत मी हेड ऑफीसला

कळवले होते किंवा कसे. मी १२ वर्षापासुन सेंट्रल बँकेत नोकरीस आहे. बँक मित्र म्हणुन बँकेतर्फे वसुली करण्याचे काम बँक मित्राच्या डयुटी लिस्टमध्ये असते.

प्रश्न– आरोपी विथड्रॉ केलेले पैसे स्वतःच्या खात्यातटाकल्याबाबत व एफडी रिसीटवर खोटया सहया केल्याबाबत तुम्हाला तुमची बदली झाल्यानंतर कळाले की तुम्ही वडझीरे येथे शाखाधिकारी असताना तुम्हाला कळाले?

उत्तर– मी वडझीरे येथे असताना माझ्याकडे एक दोन तक्रारी आल्या होत्या व काही तक्रारी माझी बदली झाल्यानंतर आल्या.

माझ्याकडे आलेल्या एक दोन तक्रारी या लेखी स्वरुपाच्या होत्या. हे माझ्या लक्षात नाही की त्या दोन तक्रारींमध्ये बँक कर्मचा–यांचे नाव होते का केवळ गौतम जाधवचे नाव होते.

प्रश्न– त्या दोन्ही तक्रारींमध्ये तक्रारदारांनी कॅशीयर बोरुडे व तुमचे म्हणजेच भुषण संखे हे नाव टाकले होते?

उत्तर– त्याबाबत मला माहीती नाही.

त्या दोन्ही तक्रारी अर्जांना आम्ही रिजनल ऑफीसमध्ये पाठवले. त्या दोन्ही तक्रारी अर्जांबाबत रिजनल ऑफीसने एका मॅनेजरला म्हणजेच संदीप बिरादार यांना चौकशीसाठी पाठवले होते. हे म्हणणे खरे आहे की बिरादार यांनी बँकेत आल्यावर सगळे रेकॉर्ड तपासले होते. हे म्हणणे खरे नाही की मी मॅनेजर असताना बिरादार यांनी रेकॉर्ड तपासल्यावर त्यांना ब–यापैकी अनियमितता आढळुन आल्या होत्या. हे म्हणणे खरे नाही की बिरादार यांना बँकेत अकाउंट, एफडी पावत्या व विथड्रॉवल स्लीपबाबत ब–याच अनियमितता दिसल्याने माझी त्यावेळी वडझीरे शाखेतुन बदली करण्यात आली होती.

प्रश्न– दि.२०.१०.२०२० रोजी तुमची वडझीरेतुन बदली झाली असताना व दोन तक्रारी तुमच्या वेळेस आल्या असताना ही फिर्याद दि.१९.३.२०२१ रोजी का दाखल केली याबाबत तुम्हाला सांगता येईल का?

उत्तर– मला सांगता येणार नाही.

पंचनाम्यासाठी मला का बोलावले याचे कारण मला सांगता येणार नाही. हे म्हणणे खरे नाही की मी शाखाधिकारी असताना ब–यापैकी माझ्याकडुन निष्काळजीपणा झाल्यामुळे मला बँकमध्ये पंचनाम्यासाठी बोलावले होते. हे म्हणणे

खरे आहे की पंचनाम्यात जे पंच होते ते वडझीरे शाखेतीलच सर्व स्टाफ होता. पंचनाम्यावर माझ्या व्यतिरीक्त अजुन कोणाच्या सहया होत्या हे मला सांगता येणार नाही. पंचनाम्यावेळी सहयांचा नमुना असलेला कागद सिल करुन तपासी अधिकारी वाघ हे त्यांच्यासोबत घेवुन गेले होते. आता मला नि.११२ वरील यादीमध्ये अ.क्र.६ वर Annexture–4 दाखवण्यात आले. ते Annexture–4 आमच्या बँकेचे आहे. त्यामध्ये अ.क्र.१वर कॅश डिपॉझीटम्हणुन रु.४९,०००/– दर दिवस व अ.क्र.४ वर कॅश विथड्रॉवल रु.४९,०००/– दर दिवस असल्याचे नमुद आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या Annexture–4 आमच्या बँकेने बँक करस्पॉडंटसाठी काढलेले आहे. हे म्हणणे खरे आहे की त्या Annexture–4 प्रमाणे बँक करस्पॉडंटला बँक मॅनेजर काम करायला सांगत असतो.

प्रश्न– Annexture–4 प्रमाणे काम करण्यास तुम्ही बँक मॅनेजर म्हणुन असताना गौतम जाधव यांना सांगितले होते?

उत्तर– ते माझ्या लक्षात नाही.

प्रश्न– बँक करस्पॉन्डंटला Annexture–4 प्रमाणे किती पैसे डिपॉझीट व किती पैसे विथड्रॉ करण्याचे अधिकार आहे?

उत्तर– रक्कम रु.४९,०००/–.

हे म्हणणे खरे आहे की Annexture–4 प्रमाणे बँक करस्पॉन्डंटने काम करणे बंधनकारक आहे. हे म्हणणे खरे आहे की Annexture–4 मध्ये नमुद अटींविरुध्द बाहेर जावुन ट्रान्स्जॅक्शन करणे बेकायदेशीर आहे.

प्रश्न– Annexture–4 मधील गाईडलाईन्सच्या बाहेर जावुन एखादा बँक करस्पॉन्डंट काम करु शकतो का?

उत्तर– नाही.

हे म्हणणे खरे आहे की Annexture–4 प्रमाणे गौतम जाधव यास रु.४९,०००/–चे ट्रान्जॅक्शन करण्याची परवानगी होती. सदर Annexture–4 ला ओळखीसाठी **नि.१५२** देण्यात येते. एक लाखाच्या वरचे ट्रान्जॅक्शन बाबत व्हाऊचर पासींगसाठी शाखाधिकारीकडे किंवा सहाय्यक शाखाधिकारी यांचेकडे जाते. हे माझ्या लक्षात नाही की गोरख अण्णाजी खोसे यांची विथड्रॉवल स्लीप पासींगसाठी माझ्याकडे आली होती किंवा कसे. ती विथड्रॉवल स्लीप किती रुपयांची

होती हे लक्षात नाही. हे म्हणणे खरे आहे की पोलीसांसमोरील जबाबात मी काय सांगितले ते माझ्या आता लक्षात नाही.

प्रश्न– गोरख खोसे यांची दीड लाखाची विथड्रॉवल स्लीप तुमच्याकडे पासींगसाठी आली असेल?

उत्तर– आली असेल.

खोसे यांचा तक्रारी अर्ज माझ्याकडे आल्याचे लक्षात नाही.

प्रश्न– गोरक्ष खोसे यांच्या जबाबात त्यांनी त्यांची दीड लाखाची विथड्रॉवल स्लीपवर त्यांची सही करुन ती कॅशीयर बोरुडे यांचेकडे दिली असल्याचे सांगितले आहे याबाबत तुम्हाला काय सांगायचे आहे?

उत्तर– कॅशीयर बोरुडे यांचेकडे दिली असेल, माझ्याकडे दिली नाही.

हे म्हणणे खरे आहे की ती विथड्रॉवल स्लीप दीड लाखाची असल्यामुळे ती मॅनेजर किंवा असीस्टंट मॅनेजर यांच्याकडे क्लीअरींगसाठी आली असेल. मी मॅनेजर असताना असीस्टंट मॅनेजर तेव्हा कोणी नव्हते. विद्या उघडे ॲग्रीकल्चरल ऑफीसर होत्या.

प्रश्न– गोरक्ष खोसे यांची विथड्रॉवल स्लीप क्लीअरींगसाठी तुम्ही मॅनेजर असल्याने व त्यावेळी कोणी असीस्टंट मॅनेजर नसल्याने तुमच्याकडेच आली होती?

उत्तर– माझ्याकडे किंवा इतर अधिका–याकडे आली असेल.

गोरक्ष खोसे यांची दीड लाख रुपयांची विथड्रॉवल स्लीप आमच्या वडझीरे शाखेच्या बॅंकेतच क्लीअर झाली.

प्रश्न– गोरक्ष खोसे यांचे दीड लाख रुपये विथड्रॉ झाल्यासंदर्भात त्यांना मेसेज गेला असेल का?

उत्तर– जर गोरक्ष खोसे यांचा मोबाईल नंबर लिंक असेल तर मेसेज गेला असेल.

आता मला नि.९७ वरील गोरक्ष अण्णाजी खोसे यांचा तक्रारी अर्ज दाखवण्यात आला. तो अर्ज कोणी रिसीव्ह केला याबाबत मला सांगता येणार नाही. त्या अर्जावर माझी सही नाही.

प्रश्न– नि.९७ वरील गोरक्ष खोसे यांचा तक्रारी अर्ज त्यांनी तुमच्याकडे दिला नाही असे म्हणणे बरोबर होईल का?

उत्तर– होय.

आता मला माझा पोलीसांसमोरील जबाब दाखवण्यात आला. तो जबाब मीच दिला होता. हे म्हणणे खरे आहे की माझ्या पोलीसांसमोरील जबाबात गोरख आनाजी खोसे यांच्या नावाचा उल्लेख आहे. आता मला माझ्या पोलीसांसमोरील जबाबातील अधोरेखांकीत भाग–अ दाखवण्यात आला.

प्रश्न– तुमच्या पोलीसांसमोरील जबाबात 'गौतम जाधव त्याच भागातील राहणारा असल्याने त्या परिसरातील बँकेचे ग्राहक त्याच्या ओळखीचे होते, लवकर काम होईल या उद्देशाने बँकेचे कोरे व्हाउचर या बाहेरच लटकलेले असतात तसेच फीक्स्ड डिपॉझीटच्या को–या पावत्या या बँकेच्या कस्टडीतुन व माझ्या सहीने बाहेर काढत व ठेवत असत' असे नमुद आहे म्हणजेच गौतम जाधव हा तुमच्या परवानगीने पावत्या बाहेर काढत होता व ठेवत होता का?

उत्तर– नाही.

प्रश्न– पोलीसांनी तुमच्या जबाबात गौतम जाधव तुमच्या सहीने पावत्या बाहेर काढत होता व ठेवत होता असे का नमुद केले आहे?

उत्तर– हे मला सांगता येणार नाही.

प्रश्न– असे म्हणणे बरोबर होईल का की पोलीसांनी तुमच्या सांगण्याप्रमाणे जबाब घेतला नाही?

उत्तर– होय.

हे म्हणणे खरे आहे की पोलीसांसमोर मी जो जबाब दिला तो मी वाचुन पाहीला नव्हता.

प्रश्न– पोलीसांसमोरील तुमच्या जबाबावर तुम्ही न वाचताच सही केली?

उत्तर– त्या जबाबावर माझी सही नाही.

हे म्हणणे खरे आहे की दि.८.८.२०२२ रोजी माझा पोलीसांसमोरील झालेला जबाब व मला आता उलटतपासात दाखवण्यात आलेला पोलीसांसमोरील जबाब तोच आहे का हे मी सांगु शकत नाही.

प्रश्न– दि.२३.९.२०२० रोजी गोरक्ष अण्णाजी खोसे यांना विथड्रॉवल बाबत मोबाईलवर मेसेज आला असल्यावेळेस तुम्हीच मॅनेजर होते?

उत्तर– त्यावेळी मीच मॅनेजर होतो.

प्रश्न– नि.९७ वरील गोरक्ष खोसे यांच्या तक्रारी अर्जामध्सये त्यांनी पैसे विथड्रॉवल

झाल्यावर त्यांना मोबाईलवर मेसेज आला असल्याचे सांगितले असुन मात्र ते पैसे त्यांच्या खात्यात जमा झाले नसल्यामुळे ते वारंवार बँक अधिका–यांना म्हणजे तुम्हाला भेटले असे नमुद आहे?

(सरकारी वकीलांनी आक्षेप घेतला की सदर साक्षीदाराने अगोदरच तो अर्ज त्यांच्याकडे आला नसल्याचे व त्यावर रिसीव्ह म्हणुन त्यांची सही नसल्याचे सांगितले आहे. त्यामुळे हा प्रश्न विचारता येणार नाही).

उत्तर– गोरक्ष खोसे मला भेटलेच नाही.

हे म्हणणे खरे नाही की दि.२४.९.२०२० रोजी गोरक्ष अण्णाजी खोसे यांनी त्यांच्या खात्यात रक्कम जमा न झाल्यासंदर्भात माझ्याकडे तक्रारी अर्ज दिला होता.

प्रश्न– नि.९७ वरील गोरक्ष खोसे यांचा तक्रारी अर्जात त्यांनी तुम्ही व कॅशीयर बोरुडे यांनी त्यांची फसवणुक केली असल्याचे नमुद आहे

उत्तर– ते खोटे आहे.

(सरकारी वकीलांनी आक्षेप घेतला की सदर साक्षीदाराने अगोदरच तो अर्ज त्यांच्याकडे आला नसल्याचे सांगितले आहे त्यामुळे गोरक्ष खोसे यांच्या अर्जासंदर्भात् साक्षीदारास प्रश्न विचारता येणार नाही).

प्रश्न– गोरक्ष खोसे यांचे दीड लाख रुपये तुम्ही आरोपीच्या खात्यात जमा झाले असल्याचे कोर्टासमोर सरतपासात सांगितले आहे?

उत्तर– मी तसे सांगितले नाही.

प्रश्न– गौतम जाधव यांना तुमच्या बँकेने किती रकमेचा ओव्हरड्राफट दिला होता?

उत्तर– अकाउंटला लिमीट नसते.

हे मला सांगता येणार नाही की गोरक्ष खोसे यांचे दीड लाख रुपये आमच्या बँकेने त्यांना व्याजासहीत परत केले. आता मला चार्जशिटमध्ये दाखल शोभा वसंत शिर्के यांची रक्कम रु.३,८०,०००/– ची दि.३१.८.२०२० रोजीची एफडी पावतीची प्रत दाखवण्यात आली. ती पावती आमच्याच बँकेची आहे. त्या पावतीवर माझी सही नाही. त्यावर कोणाच्या सहया आहेत हे मी सांगु शकत नाही. त्यापावतीवर असे कुठे लिहीलेले नसते की मॅनेजरने कुठे सही करावी व कॅशीयरने कुठे सही करावी.

प्रश्न– त्या पावतीवर बँक मॅनेजरची व बँक कर्मचा–याची सही आहे हे बरोबर आहे का?

उत्तर– असु शकते.

हे म्हणणे खरे आहे की एफडी पावतीवर जर काही खाडाखोड झाली तर त्यावर खोडुन खाली लिहीले जाते व तिथे सही केली जाते. हे म्हणणे खरे आहे की जो कर्मचारी त्या पावतीवर लिहीतो तोच कर्मचारी खाडाखोड दुरुस्त करुन सही करत असतो. शोभा शिर्के यांची मला दाखवण्यात आलेल्या एफडीच्या पावतीवर खाडाखोड दिसत आहे व त्याबाबत सही दिसत आहे. बँक करस्पॉन्डंट यांना फिक्स डिपॉझीट करण्याचा अधिकार नसतो. हे म्हणणे खरे आहे की मला दाखवण्यात आलेल्या शोभा शिर्के यांची फिक्स्ड डिपॉझीटची पावती बँक करस्पॉन्डंट यांनी केलेली नाही. शिर्के यांच्या पावतीबाबत फ्रॉड व अफरातफर झाल्याबाबत मला माझी बदली झाल्यावर कळाले. फिक्स्ड डिपॉझीट पावत्यांची कस्टडी कॅशीयर किंवा शाखाधिकारी किंवा इतर ऑफीसरकडे होती. हे म्हणणे खरे आहे की मी शाखाधिकारी असताना फिक्स्ड डिपॉझीट पावत्यांची कस्टडी कॅशीयर बोरुडे, माझ्याकडे व विद्या उघडे यांच्याकडे होती. हे म्हणणे खरे आहे की को–या फिक्स्ड डिपॉझीटच्या पावत्या बँकच्या लॉकरमध्ये ठेवलेल्या असतात व त्या लॉकरची चावी कॅशीयरकडे असते. त्या पावत्या लॉकरमधुन काढण्यासाठी कॅशीयरला शाखाधिकारी यांची परवानगीची गरज नसते.

प्रश्न– तुमच्याकडे दोन ग्राहकांच्या तक्रारी आल्यावर व हेड ऑफीसवरुन अधिकारी चौकशीसाठी आल्यावर काही पावत्या मिसींग असल्याचे आढळुन आले होते का?

उत्तर– त्या चौकशीचा रिपोर्ट आम्हाला सांगत नसतात.

हे म्हणणे खरे आहे की मला दाखवण्यात आलेली शोभा वसंत शिर्के यांची दि.३१.८.२०२० रोजीची पावती ही माझ्या कार्यकाळातीलच आहे.

प्रश्न– शोभा शिर्के यांच्या पावतीवर तुम्ही तीन जण म्हणजेच तुम्ही, विद्या उघडे व कॅशीयर उघडे यांच्यापैकीचा कोणाच्या तरी त्या दोन सहया आहेत?

उत्तर– असु शकतील.

प्रश्न– शोभा शिर्के यांच्या पावतीवर तुमची सही नसल्याचे तुम्ही सांगितले असल्याने त्या दोन सहया कॅशीयर बोरुडे व विद्या उघडे यांच्याच आहेत असे म्हणणे बरोबर होईल का?

उत्तर– असु शकते. ते मी नाही सांगु शकत कारण मी त्यांच्या सहया ओळखत नाही.

शोभा शिर्के यांच्या पावतीवरील बँक स्टाफच्या सहया या बँकेमध्येच झाल्या.

प्रश्न– शोभा शिर्के यांच्या पावतीवर बँक स्टाफ व्यतिरीक्त दुस–या व्यक्तीच्या सहया आहेत का?

उत्तर– मी ते कसे सांगु शकतो.

शोभा शिर्के यांच्या पावतीवर त्या दोन सहया कोणाच्या आहेत हे कोण सांगु शकेल याबाबत मला माहीत नाही. सदर पावतीस ओळखीसाठी **नि.१५३** देण्यात येते. मी माझ्या पोलीसांसमोरील जबाबात गौतम जाधव याने माझी खोटी सही केली असे सांगितलेले नाही. हे म्हणणे खरे आहे की एफडी केलेल्या पावत्यांची व को–या पावत्यांची नोंद आमच्या बँकेच्या रजिस्टरला व कॉम्प्युटरला असते. शोभा शिर्के यांच्या एफडीच्या पावतीची नोंद आमच्या बँकेच्या रजिस्टरला व कॉम्प्युटरला असल्याबाबत मी चेक करुन सांगु शकतो. पोलीसांसमोर जबाब देण्याच्या अगोदर शोभा शिर्के यांच्या एफडीची नोंद मी चेक केली नव्हती कारण माझी बदली झाली होती. हे म्हणणे खरे नाही की एफडीच्या तयार केलेल्या पावत्या व को–या पावत्यांबाबत रजिस्टरमध्ये महीन्याच्या शेवटी किती एफडी जमा झाल्या व किती शिल्लक राहील्या याची नोंद घ्यावी लागते.

प्रश्न– ती नोंद मग कधी घ्यायची असते?

उत्तर– ऑडीटच्या वेळी घेतली जाते.

प्रश्न– तुम्ही शाखाधिकारी असताना असे काही ऑडीट झाले होते का?

उत्तर– झाले होते.

ऑडीट कधी व कोणत्या वर्षी झाले हे सांगता येणार नाही. माझ्यावेळी जे ऑडीट झाले त्या ऑडीटमध्ये शोभा शिर्के यांच्या पावतीबाबत काही निष्कर्ष आला नव्हता. हे म्हणणे खरे आहे की मी शाखाधिकारी असताना बँकेत अपहार झाला होता.

प्रश्न– तुम्ही शाखाधिकारी असताना झालेल्या अपहाराबाबत ऑडीटमध्ये निष्कर्ष आला होता?

उत्तर– माझ्यावेळी जनरल ऑडीट झाले होते. त्या जनरल ऑडीटमध्ये अपहाराबाबत काही आले नव्हते.

मी शाखाधिकारी असताना जे ऑडीट झाले त्याचा रिपोर्ट मी दाखल

करायला तयार आहे.

प्रश्न– तुम्ही कधीपर्यंत तो रिपोर्ट दाखल करु शकता?

उत्तर– मला त्यासाठी परवानगी घ्यावी लागेल.

प्रश्न– जनरल ऑडीट रिपोर्टमध्ये अपहाराबाबत काही निष्कर्ष आला नसल्याचे तुम्ही सांगत असल्यामुळे खोसे व शिर्केबाबत तुम्ही दिलेला जबाब खोटा आहे का?

उत्तर– खोटा नाही.

जनरल ऑडीटमध्ये अपहाराबाबत काही निष्कर्ष निघाला नसल्याने मी खोसे व शिर्के यांच्याबाबत का जबाब दिला हे मला सांगता येणार नाही.

प्रश्न– तुम्ही खोसे व शिर्केबाबत जबाब का दिला हे तुम्ही सांगु शकत नसल्याने ते कोण सांगु शकते?

उत्तर– आम्हाला पोलीसांनी जबाब देण्यासाठी बोलावले होते.

हे म्हणणे खरे नाही की मी पोलीसांच्या सांगण्याप्रमाणे जबाब दिला.

आरोपीतर्फे विधीज्ञांनी दिलेला अर्ज **नि.१५४** वरुन उलटतपास पुढील तारखेपर्यंत तहकुब.

श्रवणोत्तर स्वीकृती

सही.

(एन.एस.सबनीस)

दिनांकः ३०/०८/२०२५.

न्यायदंडाधिकारी, प्रथमवर्ग, कोर्ट नं.२,

पारनेर.